22 SEP 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या संरक्षणाची जबाबदारी जिजाबाईंनी पार पाडली : संयोगिताराजे

## 'महाराणी जिजाबाई कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या' पुस्तक प्रकाशित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराणी ताराराणी यांनी कोल्हापूर संस्थानाची स्थापना केली; परंतु कोल्हापूर राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी महाराणी जिजाबाईंनी पार पाडली, असे प्रतिपादन संयोगिताराजे छत्रपती यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे 'महाराणी जिजाबाई : कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संयोगिताराजे छत्रपती यांच्या हस्ते विद्यापीठाच्या वस्तू संग्रहालयात पार पडला.



**कोल्हापूर : कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या' या पुस्तकाचे प्रकाशन करताना संयोगिताराजे छत्रपती, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती जाधव, डॉ. रमेश जाधव आदी.**

करवीरच्या महाराणी जिजाबाई या छत्रपती ताराराणी यांच्या स्नुषा. त्यांनी कोल्हापूर राज्याचे संरक्षण केले. काही कुणबींना प्रशासनाची जबाबदारी दिली, तसेच सतीबंदीचा कायदा केला; परंतु अशा या कर्तृत्ववान जिजाबाई यांच्याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती. त्यांच्यावर प्रकाश टाकणारे पुस्तक बुधवारी प्रकाशित झाले.

यावेळी शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी पुस्तक प्रकाशनामागील अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली.

डॉ. रमेश जाधव म्हणाले, ज्या विषयावर माहिती उपलब्ध नाही, त्या विषयावर पीएच.डी. करून डॉ. विजयाराणी पाटील यांनी मोठे धैर्य दाखवले आहे. अध्यक्षीय मनोगतामध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, या संशोधनाचा इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये अनुवाद झाल्यास महाराणी जिजाबाईंचे कार्यकर्तृत्व सर्वदूर पोहोचेल. प्राध्यापिका नेहा वाडेकर यांनी आभार मानले. सुष्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. पुस्तक प्रकाशनास डॉ. जयसिंगराव पवार, सुनीलकुमार लवटे, डॉ. एस. एन. पवार आदी उपस्थित होते.

लोकमत

# 'सिनेट' निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला

## वेळापत्रक जाहीर : १४ नोव्हेंबरला मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद या अधिकार मंडळांच्या निवडणुकीचा बिगुल वाजला. या निवडणुकीसाठी दि. १४ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्याबाबतचे वेळापत्रक विद्यापीठ प्रशासनाने बुधवारी संकेतस्थळावर जाहीर केले.

सहा व्यवस्थापन प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन अध्यापक (प्राध्यापक), तीन विद्यापीठ अध्यापक आणि दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभेवर, तर विद्यापीठ आणि महाविद्यालयीन अध्यापकांमधून आठजण विद्या परिषदेवर, तसेच प्रत्येक अभ्यास मंडळावर तीन महाविद्यालयीन विभागप्रमुख या निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या जागांसाठी मतदान होणार आहे. पदवीधर मतदार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तात्पुरती मतदार यादी बुधवारी प्रसिद्ध झाली. निवडणुकीच्या वेळापत्रकाची शिक्षणसंस्था, महाविद्यालय, अधिविभाग प्राध्यापक, पदवीधर मतदार यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

### वेळापत्रक असे

- तात्पुरत्या मतदार यादीबाबत दुरुस्ती अथवा आक्षेप नोंदवणे : २६ सप्टेंबर
- अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी : १२ ऑक्टोबर
- निवडणूक सूचनेची प्रसिद्धी : १४ ऑक्टोबर
- उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख : २८ ऑक्टोबर
- अर्जाची छाननी : ३१ ऑक्टोबर
- अर्ज माघारी : १ नोव्हेंबर
- अंतिम पात्र उमेदवारांची यादीची प्रसिद्धी : ३ नोव्हेंबर
- मतदान प्रक्रिया : १४ नोव्हेंबर
- मतमोजणी : १६ नोव्हेंबर

22 SEP 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ निवडणूक; १४ नोव्हेंबरला मतदान

## वेळापत्रक जाहीर; यंदा तिपटीने जास्त मतदार नोंदणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ प्राधिकरण निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यंदा तिप्पट म्हणजे ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांनी नावनोंदणी केली आहे.

विद्यापीठ निवडणुकीसाठी जुलैअखेरीस मतदार नोंदणीची मुदत संपली आहे. शिक्षक २०८, महाविद्यालय २७७ विभागप्रमुख १९५, महाविद्यालय प्राचार्य आणि ११८ व्यवस्थापन प्रतिनिधींचा नावनोंदणीत समावेश आहे. विद्यापीठाने दि.२१ रोजी निवडणुकीचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. यामध्ये विद्यापीठातील दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन प्राध्यापक, तीन विद्यापीठ प्राध्यापक आणि दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभा सदस्य, विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापकांमधून आठ प्राध्यापक विद्यापरिषदेवर तसेच प्रत्येक अभ्यास मंडळावर तीन महाविद्यालयीन विभागप्रमुख या पदांसाठी निवडणूक होणार आहे.

२६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदीबाबत कुलसचिवांकडे दुरुस्ती आक्षेप नोंदविता येतील. १ ऑक्टोबर रोजी दुरुस्त मतदार यादी जाहीर होईल. ६ ऑक्टोबरला सायंकाळी दुरुस्त मतदार यादीसंदर्भात काही आक्षेप असल्यास कुलगुरूंकडे अपील करता येणार आहे. १२ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. निवडणुकीची सूचना १४ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाल्यानंतर २८ ऑक्टोबरच्या सायंकाळी पाच वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील.

३१ ऑक्टोबरला उमेदवारी अर्जाची छाननी होईल. १ नोव्हेंबरला सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २ नोव्हेंबर रोजी अर्जाच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करता येईल. ३ नोव्हेंबरला उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू होईल. त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे. संकेतस्थळावरील निवडणूक वेळापत्रकाची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# उन्हाळी सत्र परीक्षा निकालातील त्रुटी दुरुस्ती युद्धपातळीवर सुरू



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र-परीक्षा निकालातील त्रुटी दुरुस्तीसाठी परीक्षा विभागाने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत. त्यानुसार बहुतांश विद्यार्थ्यांचे प्रलंबित निकाल जाहीर करण्यात आले असल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. विद्यापीठाकडून जून महिन्यापासून उन्हाळी सत्राच्या विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षा घेण्यात आल्या. त्यामध्ये काही विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण, निकालात त्रुटी आढळून आल्या होत्या. याबाबत परीक्षा विभागाने वेगळा सेल निर्माण केला आहे. त्यानुसार ऑन व कॅप विभागाकडून निकालातील त्रुटी दुरुस्तीचे काम सुरू आहे. महाविद्यालयांकडून आलेले अर्ज व प्रलंबित केसेसचा निपटारा लवकरच पूर्ण होईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

22 SEP 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची सिनेट निवडणूक १४ नोव्हेंबरला

## प्रशासनाकडून कार्यक्रम जाहीर, १६ नोव्हेंबरला मतमोजणी

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाचा (सिनेट) निवडणूक कार्यक्रम विद्यापीठ प्रशासनातर्फे बुधवारी जाहीर करण्यात आला. सिनेटसाठी प्रत्यक्ष मतदान १४ नोव्हेंबर, तर मतमोजणी १६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी याबाबतचे पत्रक प्रसिद्ध केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकांकडे शिक्षण क्षेत्रातील अनेकांचे लक्ष लागून होते. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक मतदार नोंदणी करण्यासाठी विविध पक्ष व संघटनांनी प्रयत्न केले होते. बुधवारी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार विद्यापीठ सिनेटची निवडणूक जाहीर करण्यात आली आहे.

या निवडणुकीत दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन अध्यापक, तीन विद्यापीठ अध्यापक आणि दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभेवर, तर विद्यापीठ व महाविद्यालयीन अध्यापकांमधून आठ अध्यापक विद्या परिषदेवर, तसेच प्रत्येक अभ्यास मंडळावर आणि तीन महाविद्यालयीन विभागप्रमुख यांची निवड निवडणुकीद्वारे होणार आहे. निवडणुकीचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

### घडामोडींना वेग

सिनेट निवडणुकांसाठी विविध पक्ष, संघटना तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी कंबर कसली आहे. अधिकाधिक जागा मिळवण्यासाठी त्यांच्याकडून तयारी केली जात आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने इच्छुकांच्या हलचालींना वेग आला आहे.

**निवडणूक कार्यक्रम असा**

तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध : २१ सप्टेंबर, तात्पुरत्या मतदार यादीवर कुलसचिवांकडे आक्षेप नोंदवणे : २६ सप्टेंबर, दुरुस्त मतदार यादी प्रसिद्ध करणे : १ ऑक्टोबर, यादीवर आक्षेप असल्यास कुलगुरूंकडे आक्षेप नोंदवणे : ६ ऑक्टोबर, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे : १२ ऑक्टोबर, निवडणूक सूचना प्रसिद्ध करणे : १४ ऑक्टोबर, उमेदवारी स्वीकारणे अंतिम तारीख : २८ ऑक्टोबर, अर्ज छाननी : ३१ ऑक्टोबर, उमेदवारी अर्ज मागे घेणे : १ नोव्हेंबर, अर्ज वैधतेबाबत कुलगुरूंकडे अपील : २ नोव्हेंबर, अंतिम पात्र उमेदवार यादी प्रसिद्ध : ३ नोव्हेंबर, प्रत्यक्ष मतदान : १४ नोव्हेंबर, मतमोजणी : १६ नोव्हेंबर

22 SEP 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेसाठी १४ नोव्हेंबरला मतदान

## निवडणूक कार्यक्रम जाहीर; १६ नोव्हेंबरला मतमोजणी व निकाल होणार जाहीर

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक आज जाहीर झाली. १४ नोव्हेंबरला मतदान होणार असून १६ नोव्हेंबरला निकाल घोषित केला जाईल. विद्यापीठातील जाहीर केलेल्या कालावधीत ज्या पदवीधरांनी निवडणुकीसाठी नोंदणी केलेली आहे, त्यांनाच मतदानाचा अधिकार असेल. प्रभारी कुलसचिवांनी हा कार्यक्रम जाहीर केला आहे.

विद्यापीठाचे संचालन अधिसभा व व्यवस्थापन परिषदेच्या माध्यमातून केले जाते. विद्यापीठातील अधिविभाग आणि विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातून पदवी घेतलेले पदवीधर यासाठी मतदान करतात. तसेच प्राचार्य, प्राध्यापक आणि संस्थाचालक यांनाही अधिसभेमध्ये निवडून येण्याची संधी असते. याशिवाय राज्यपाल नियुक्त जागाही असतात. चालू अधिसभेची मुदत एक महिन्यापूर्वी संपली. त्यामुळे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, १४ नोव्हेंबरला मतदान होईल, तर १६ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल.

### आघाड्यांकडे लक्ष



विद्यापीठ विकास आघाडी व विद्यापीठ विकास मंच यांनी एकत्रित येऊन मागील अधिसभा निवडणूक लढवली होती. नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुन्हा एकदा आघाडी सोबत जाण्याचा विचार बोलून दाखवला होता. त्यामुळे आता विद्यापीठ विकास मंच व विद्यापीठ विकास आघाडी यांच्यामध्ये जागांचे वाटप कसे होते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. तसेच विद्यापीठातील इतर संघटना काय भूमिका घेतात, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

### निवडणूक कार्यक्रम...

- २१ सप्टेंबर : तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध करणे
- २६ सप्टेंबर सायंकाळी पाचपर्यंत: तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदीबाबत कुलसचिवांकडे दुरुस्ती, आक्षेप नोंदवणे.
- एक ऑक्टोबर : दुरुस्त मतदार यादी प्रसिद्ध करणे
- सहा ऑक्टोबर सायंकाळी पाचपर्यंत : दुरुस्त मतदार यादीसंदर्भात काही आक्षेप असल्यास कुलगुरूंकडे अपील करणे
- १२ ऑक्टोबर : अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे
- १४ ऑक्टोबर : निवडणूक सूचना प्रसिद्ध करणे
- २८ ऑक्टोबर : उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख
- ३१ ऑक्टोबर : उमेदवारी अर्जाची छाननी करणे व वैध-अवैध उमेदवारी अर्ज जाहीर करणे (अर्जाच्या छाननीचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिद्ध होईल)
- १ नोव्हेंबर सायंकाळी पाचपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख
- २ नोव्हेंबर : उमेदवारी अर्जाच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे अपील करणे
- ३ नोव्हेंबर : अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे
- १४ नोव्हेंबर : सकाळी नऊ ते सायंकाळी पाचपर्यंत मतदान
- १६ नोव्हेंबर : सकाळी आठपासून मतमोजणी व निकाल जाहीर करणे

22 SEP 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या ४९४ परीक्षांचे निकाल जाहीर

## वाद संपुष्टात : ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाइन पद्धतीने

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठ व विद्यार्थ्यांच्या आरोप-प्रत्यारोपांमुळे गाजलेल्या विद्यापीठातील ७४७ अभ्यासक्रमांपैकी आतापर्यंत ४९४ परीक्षांचे निकाल आज जाहीर केले. आज एम. ए. पॉलिटिक्सच्या सेमिस्टर एक व दोनच्या, एम. ए. मास कम्युनिकेशनच्या एक व दोन, तर बी. ए. च्या सेमिस्टर पाच व सहांचे निकाल जाहीर करण्यात आले.

विद्यापीठाने 'ओएमआर' पद्धतीने या परीक्षा घेतल्या. त्यात उत्तरपत्रिका व प्रश्नपत्रिकेवरील नंबर व्यवस्थित न लिहिल्याने अनेक विद्यार्थी परीक्षेला हजर असूनही त्यांची गैरहजेरी पडली होती. अशा विद्यार्थ्यांचे निकाल सुधारित करण्यासाठी विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयाकडून माहिती मागवली होती. परीक्षेच्या या गोंधळाबाबत विद्यापीठात 'अभाविप'सह अन्य शैक्षणिक संघटनांनी आंदोलन केले होते. ही माहिती संकलित झाल्यानंतर आज या परीक्षांचे निकाल विद्यापीठाने जाहीर केले. अजूनही ज्या विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत तक्रारी असतील त्यांनी महाविद्यालयामार्फत आवश्यक ती माहिती सादर करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

22 SEP 2022 तरूण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध पदांसाठी १४ नोव्हेंबरला निवडणूक

## संकेतस्थळावर वेळापत्रक जाहीर : यंदा ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांची नोंदणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया पदवीधर मतदार नोंदणीपासून सुरू झाली. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. तर निवडणूक कार्यक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे. यामध्ये विद्यापीठातील दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन प्राध्यापक, तीन विद्यापीठ प्राध्यापक आणि दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभा सदस्य, विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापकांमधून आठ प्राध्यापक विद्यापरिषदेवर, चाळीस सदस्य अभ्यासमंडळावर तीन महाविद्यालयीन विभागप्रमुख या पदांसाठी ही निवडणूक होणार आहे.

जुलै महिन्याच्या अखेरीस मतदार नोंदणीची मुदत संपली असून, यंदा ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांनी नावनोंदणी केली. तसेच शिक्षक २०८,



महाविद्यालय २७७, विभागप्रमुख १९५, महाविद्यालय प्राचार्यांची आणि ११८ व्यवस्थापन प्रतिनिधींची नावनोंदणी केली आहे. १४ नोव्हेंबरला प्रत्यक्ष मतदान होणार आहे. २१ सप्टेंबर तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द केली आहे. २६ सप्टेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदीबाबत कुलसचिव यांच्याकडे दुरूस्ती आक्षेप नोंदवायचा आहे. १ ऑक्टोबर रोजी दुरूस्त मतदार यादी जाहीर होणार आहे. ६ ऑक्टोबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत दुरूस्त मतदार यादीसंदर्भात काही आक्षेप असल्यास कुलगुरू यांच्याकडे तक्रार करायची आहे. १२ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणार आहे.

निवडणूक सूचना १४ ऑक्टोबर रोजी प्रसिध्द होईल. ३१ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करून वैध, अवैध उमेदवारी अर्ज जाहीर होणार. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख. २ नोव्हेंबर सायंकाळी २ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरू यांच्याकडे तक्रार करावी. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द होणार. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होणार. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार असून निकाल जाहीर होणार, तरी संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या वेळापत्रकाची शिक्षणसंस्था, महाविद्यालय, अधिविभाग प्राध्यापक, पदवीधर मतदार यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले आहे.